CAREERINDIA

Language Code : **11**

इस पुस्तिका में **20** मुद्रित पृष्ठ हैं।
This booklet contains **20** Printed pages.

# SED-24-II

**प्रश्न-पत्र-II / PAPER-II**
**मराठी भाषा परिशिष्ट**
**Marathi Language Supplement**
**भाग-IV & V / PART-IV & V**

**मुख्य परीक्षा पुस्तिका संख्या / Main Test Booklet No.**

**मुख्य परीक्षा पुस्तिका कोड / Main Test Booklet Code**

**D**

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20) पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 19 & 20) of this Test Booklet.**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें। / FOR INSTRUCTIONS IN MARATHI SEE PAGE 2 OF THIS BOOKLET.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं**।
2. परीक्षार्थी भाग I एवं भाग II **या** III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं। भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं OMR उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल काले/नीले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **D**। यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है। अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग-IV : भाषा-I (मराठी) (प्र. 91 से प्र. 120)
   भाग-V : भाषा-II (मराठी) (प्र. 121 से प्र. 150)
7. भाग-IV में भाषा-I के लिए 30 प्रश्न और भाग-V में भाषा-II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं। इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं। **यदि भाषा-I और/या भाषा-II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए। जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए।**
8. **परीक्षार्थी भाग-V (भाषा-II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा-I (भाग-IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें। अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें। उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है।

## INSTRUCTIONS FOR CANDIDATES

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part I and Part II **OR** III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Black/Blue Ball Point Pen only** for writing particulars on this page/ marking responses in the OMR Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **D**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the OMR Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part-IV : Language-I (Marathi) (Q. 91 to Q. 120)
   Part-V : Language-II (Marathi) (Q. 121 to Q. 150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language-I and/or Language-II is a Language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The language being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part-V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) : ____________________
Name of the Candidate (in Capitals) :

अनुक्रमांक : (अंकों में) / Roll Number : in figures ____________________
: शब्दों में / in words ____________________

परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) : ____________________
Centre of Examination (in Capitals) :

परीक्षार्थी के हस्ताक्षर : ____________________
Candidate's Signature :

निरीक्षक के हस्ताक्षर : ____________________
Invigilator's Signature :

Facsimile Signature Stamp of
Centre Superintendent : ____________________

www.careerindia.com

CAREERINDIA

Language Code : **11**

ही पुस्तिका 20 पृष्ठ आहे.

# SED-24-II

**प्रश्नपत्रिका–II**

**मराठी भाषा पुरवणी**

**भाग IV आणि V**

चाचणी पुस्तिका कोड

**D**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील ( 19 आणि 20 ) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

**परीक्षार्थींसाठी सूचना :**

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग IV ( भाषा I ) **किंवा** भाग V ( भाषा II ) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे.**
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग I आणि भाग II **किंवा** III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ काळे / निळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड D** आहे. OMR उत्तर पत्रिकेच्या **बाजू- 2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये 60 वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे.
   **भाग-IV : भाषा-I ( मराठी )** *(प्र. 91 ते प्र. 120)*
   **भाग-V : भाषा-II ( मराठी )** *(प्र. 121 ते प्र. 150)*
7. **भाग-IV** मध्ये भाषा-I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग-V मध्ये भाषा-II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा-I व/वा भाषा-II साठी निवडलेली भाषा पेक्षा मराठी वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग-V ( भाषा-II ) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा-I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ____________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ____________________

: शब्दांमध्ये : ____________________

परीक्षाकेंद्र : ____________________

परीक्षार्थीची सही : ____________________ पर्यवेक्षकाची सही : ____________________

Facsimile signature stamp of
Centre Superintendent ____________________

www.careerindia.com

परीक्षार्थींनी **भाषा–I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–IV** मधील **( प्रश्न क्र. 91 ते 120 )** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-IV (Q.No. 91-120)**, if they have opted **MARATHI** as **Language-I** only.

www.careerindia.com

## भाग–IV

## भाषा–I

## मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **( प्रश्न क्र. 91 ते 120 )** यांची उत्तरे द्यावीत.

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 91 ते 99 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

श्रावण वाघ नुकताच वयात यायला लागला होता. त्याच्या बाजूला दुसऱ्या पिंजऱ्यात एक वाघीण होती. ती वाघीण माजावर आली आणि ती श्रावणच्या पिंजऱ्याजवळ गेली. वाघिणीचं असं वागणं त्याला समजलं नाही. त्याला तिचा राग आला आणि काही कळायच्या आतच त्यानं तिची शेपटी जोरात पकडून तोडून टाकली. त्यांच्या आवाजांनी प्राणीसंग्रहालय भयचकीत झालं. दुसऱ्या दिवशी त्याची बातमी झाली. मी त्यावेळी हत्तींच्या अभ्यासाबरोबर पूर्णवेळ पत्रकारिता करत होतो. घडलेला प्रकार अंगावर काटा आणणारा असला तरीसुद्धा ज्या धीरानं तिथल्या सगळ्यांनी त्या दिवशी काम केलं त्याला तोड नव्हती. डॉक्टरांनी वाघिणीला उपचाराकरता ताबडतोब दुसऱ्या पिंजऱ्यात हलवलं. दुर्दैवानं तिचीही शेपटी कापायला लागली आणि मला पुन्हा बांडी आठवली. एरवी श्रावण खरोखरच चांगला वाघ होता. अगदी गुणी बाळ! पण त्याच्या अशा वागण्यानं सगळे चकित झाले. तिथल्या डॉक्टरांनी मला विचारलं, ''अरे तू हत्तींशी बोलतोस. मग आमच्या श्रावणला शांत व्हायला मदत करशील का?'' मी म्हणालो, ''अहो, आमचा हत्ती शाकाहारी आहे!'' पण डॉक्टरांचा माझ्यावर विश्वास होता. जसा एखादा कसलेला शिक्षक आपला विद्यार्थी किती पाण्यात आहे हे सहज ओळखतो तसं त्यांनी कदाचित मला ओळखलं होतं. माझा हत्तींचा अभ्यास चालू असताना त्रिवेंद्रम प्राणीसंग्रहालयातल्या ऐश्वर्या सिंहिणीला पिल्लू झालं होतं आणि तिनं ते कुणाला दिसू नये अशा पद्धतीनं लपवून ठेवलं होतं. तिनं पिल्लू दाखवावं म्हणून डॉ. जेकब यांच्या अनुपस्थितीत तेव्हाच्या संचालकांनी माझी मदत घेतली होती. जेव्हा मी पूर्णवेळ हत्तींसंबंधी काम करण्यासाठी नोकरी सोडली, तेव्हा डॉक्टरांनी मला प्राणीसंग्रहालयात इंटर्नशिप करण्याबाबत मार्गदर्शन केलं. माझा हत्तींवरचा रीसर्च पेपर प्रसिद्ध झाल्यामुळे प्राणीसंग्रहालयाचे संचालक के. गंगाधरन यांनी मला 'नेक्स्ट लेव्हल कम्युनिकेशन' साठी इंटर्नशिप दिली. आता मी एकाच श्रावणबरोबर नाही, तर सात वाघांबरोबर काम करणार होतो. जोडीला नऊ बिबटे आणि पाच सिंहसुद्धा होते. त्यातला श्रावण आणि जॉर्ज या दोन वाघांबरोबरचा अभ्यास जास्त महत्त्वाचा होता. त्या संपूर्ण काळात वाघांची मानसिकता, संभाषणाचे प्रकार, घडणाऱ्या घटनांना त्यांची येणारी प्रतिक्रिया, अशा सगळ्या बाजूंनी अभ्यास करायचा होता. माझे तासंतास आता वाघाच्या पिंजऱ्याबाहेर जायला लागले. त्यांच्या हालचाली टिपणं, रेकॉर्डिंग करणं, डॉक्टरांना वेळ मिळेल तेव्हा त्यांना ते रेकॉर्डिंग दाखवून त्यावर मार्गदर्शन घेणं, असा अभ्यास जोरात चालू होता. मी वाघांचे पिंजरे असलेल्या परिसरात गेल्यावर श्रावणचे हुंकार (मोठ्या आवाजातले) ऐकायला यायचे. तेच हुंकार इतर वाघांनी वापरायला सुरुवात केली त्या वेळी लक्षात आलं, की वाघांनी मला स्वीकारलं आहे. एके दिवशी दुपारी मी श्रावणच्या पिंजऱ्याबाहेर बसून लिखाण करत होतो. तेव्हा श्रावण जवळ येऊन पिंजऱ्याला अंग घासू लागला. नंतर पिंजऱ्याला अगदी चिकटून बसला. जणू काही त्याला मला टेकून बसायचं होतं. पिंजऱ्याच्या जाळीतून मी त्याला जेमतेम स्पर्श केला आणि मांजरीनं जसं वळून बघावं तसं त्यानं वळून बघितलं. त्याच्या वागण्यात कुठेही राग दिसत नव्हता. त्या देहबोलीमध्ये 'अजून गोंजारून हवं आहे' असं सांगणं होतं.

**91.** वाघांनी आपल्याला स्वीकारले हे लेखकाच्या कशावरून लक्षात आले?

(1) हालचाली टिपल्यामुळे (2) वाघांचे हुंकार ऐकल्याने

(3) पिंजऱ्याबाहेर बसून लेखन केल्यामुळे (4) रेकॉर्डिंग ऐकवल्यामुळे

**92.** 'नऊ बिबटे' हे कोणते संख्याविशेषण आहे?

(1) क्रमवाचक (2) अपूर्णांकवाचक

(3) पूर्णांकवाचक (4) साकल्यवाचक



www.careerindia.com

CAREERINDIA

**93.** ऐश्वर्या हे कोणाचे नाव आहे?

(1) वाघाचे (2) सिंहिणीचे (3) संचालकाचे (4) डॉक्टरांचे

**94.** लेखक काम करीत असलेल्या सिंहांची संख्या किती होती?

(1) दोन (2) नऊ (3) सात (4) पाच

**95.** 'गोंजारणे' या शब्दाचा अचूक अर्थ ओळखा.

(1) स्पर्श करणे (2) विश्वासात घेणे

(3) जवळ करणे (4) माया लावणे

**96.** जॉर्ज कोण होता?

(1) मांजर (2) वाघ (3) बिबट्या (4) हत्ती

**97.** 'श्रावण वाघ' हे कोणते नाम आहे?

(1) भाववाचकनाम (2) विशेषनाम

(3) समुदायवाचकनाम (4) सामान्यनाम

**98.** '<u>चांगला</u> वाघ' यातील अधोरेखित काय आहे?

(1) क्रियापद (2) नाम (3) सर्वनाम (4) विशेषण

**99.** प्राणीसंग्रहालय भयचकीत का झाले?

(1) वाघिणीचे वागणे न समजल्यामुळे (2) श्रावणने वाघिणीची शेपटी तोडल्यामुळे

(3) हत्तीचा अभ्यास करीत असल्यामुळे (4) श्रावणला राग आल्यामुळे

www.careerindia.com

CAREERINDIA

**सूचना : पुढील कविता वाचा आणि प्रश्न क्रमांक 100 ते 105 यासाठी योग्य पर्याय निवडा.**

खाली रांगोळी पुसट
तुळशीचें वृंदावन
वाढणाऱ्या काळोखाची
मुकी भुकी दटावण,

आंतबाहेर दाटला
कडूलिंबाचा सुवास
क्षण अनावर झाला
घुसमटूनिया श्वास

..... भळभळणारें रक्त
खोल रुतलेली कांच
माझ्या हातांत बांगड्या
होत्या सहा किंवा पाच ?

ओसरल्या रक्तामध्यें
कांपे जुंनी आठवण
आहे मनगटावर
एक पुसटसा वण.

**100.** 'सहा किंवा पाच' यातील अधोरेखित काय आहे ?

(1) गुणविशेषण
(2) शब्दयोगी अव्यय
(3) उभयान्वयी अव्यय
(4) संख्याविशेषण

**101.** 'तुळस' हे काय आहे ?

(1) समुहवाचकनाम
(2) विशेषनाम
(3) सामान्यनाम
(4) भाववाचकनाम

**102.** रक्त कशामुळे वाहते आहे ?

(1) काळोख दाटल्यामुळे
(2) काच रुतल्यामुळे
(3) बांगडी फुटल्यामुळे
(4) श्वास घुसमटल्यामुळे

www.careerindia.com

CAREERINDIA

**103.** नायिकेचे स्वतःवरचे नियंत्रण कशामुळे सुटले आहे?

(1) हातातील बांगड्यांमुळे (2) कडूलिंबाच्या सुवासामुळे

(3) भळभळणाऱ्या रक्तामुळे (4) श्वास घुसमटल्यामुळे

**104.** अनावर होणे म्हणजे __________.

(1) आतबाहेर होणे (2) अनियंत्रित होणे (3) आवरून घेणे (4) अबाधित राहणे

**105.** 'काळोख' हे काय आहे?

(1) विशेषण (2) कर्म (3) कर्ता (4) क्रियापद

**106.** 'साधनांची अधिकृतता' म्हणजे __________.

(1) विद्यार्थ्यांनी स्वतःच्या घरून आणलेली साधन/सामग्री

(2) शिक्षिकेने तिच्या वर्गासाठी लिहिलेली साधन/सामग्री

(3) अधिकारी वर्गाकडून साधन/सामग्री लिहिली जाणे, विकसित होणे

(4) वास्तव जीवन संदर्भात लिहिली गेलेली, विकसित झालेली साधन/सामग्री

**107.** इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी अपर्णा, हिला समजते की ऐकण्याच्या प्रक्रियेत प्रत्येक ध्वनी, शब्द, नंतर वाक्य यांचा व्याख्यान किंवा ध्वनिफितीतील अर्थ लावण्यात अंतर्भाव असतो. ऐकणे शिकणे यासाठी ती कोणत्या पद्धतीवर विश्वास ठेवते?

(1) अधोगामी किंवा ऊर्ध्वगामी कोणतीही नाही

(2) अधोगामी–पद्धती (Top-down)

(3) ऊर्ध्वगामी–पद्धती (Bottom-up)

(4) अधोगामी आणि ऊर्ध्वगामी दोन्ही पद्धती

**108.** भाषा शिक्षणात 'सर्वांगीण क्षमता' (Systemic Competence) म्हणजे __________

(1) प्रत्येक माणसाकडे अनेक भाषांची व्यवस्था असते असे समजणे.

(2) भाषा एकव्यवस्था म्हणून कार्य करते, असे समजणे आणि वापरणे.

(3) भाषेची एक व्याकरण व्यवस्था असते, असे समजणे आणि वापरणे.

(4) प्रत्येक भाषेची एकसारखी संरचनात्मक व्यवस्था असते असे समजणे.

www.careerindia.com

CAREERINDIA

**109.** पुढे एक मजकूर किंवा विधान दिले आहे. सदर मजकूर किंवा विधान कोणत्या भाषिक नोंदीशी सुसंगत आहे?

''भारतीय राज्य घटना प्रत्येक व्यक्तीला समान मानते. याचा अर्थ देशातील प्रत्येक माणूस, म्हणजे स्त्री–पुरुष, सर्व जातीची माणसे, धर्माची माणसे, आदिवासी आणि सर्व शैक्षणिक व आर्थिक पार्श्वभूमीची माणसे एक आहेत. याचा अर्थ असा नाही की विषमता नाहीशी होणार, ती होऊ शकणार नाही. परंतु भारतीय लोकशाहीत सर्व माणसांसाठी समानतेचा सिद्धांत हा मान्य केला गेला आहे.''

(1) शास्त्रीय नोंद (2) राजकीय नोंद

(3) समाजविज्ञान नोंद (4) कायदेशीर नोंद

**110.** इयत्ता सहावीची शिक्षिका, विद्यार्थ्यांनी पाठाचा अभ्यास करण्यापूर्वी त्याची पूर्व तयारी करण्यासाठी पाठातील मजकुराचा त्यांच्या पूर्वज्ञानाशी आणि अनुभवाशी संबंध लावते. ती कथा/मजकूर प्रत्यक्षात शिकवण्यापूर्वी मुलांना त्यातील चित्रे पाहण्यास सांगते : तिला विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षित आहे?

(1) त्यांना चित्रे समजून घ्यायला लावणे.

(2) चित्रांच्या माध्यमातून कथेची कल्पना करणे.

(3) चित्रांचे कौतुक करणे.

(4) कथेच्याबाबत अनुमान लावणे.

**111.** विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या संदर्भातील प्रसंगांचा सातत्यपूर्ण अहवाल म्हणजे ___________.

(1) नैदानिक चाचणी (Diagnostic Test)

(2) पोर्टफोलियो (Portfolio)

(3) सातत्यपूर्ण विस्तृत मूल्यमापन (Continuous Comprehensive Assessment)

(4) नैपुण्य मूल्यमापन (Proficiency Assessment)

**112.** पुढीलपैकी कोणते ग्रहण कौशल्य आहे?

(1) ऐकणे व वाचणे (2) ऐकणे व लिहिणे

(3) वाचणे व बोलणे (4) बोलणे व लिहिणे

**113.** अनेक भारतीय परदेशात व्यवसायानिमित्त/रोजगारासाठी जातात नि तिथली भाषा शिकतात. या प्रेरणेला काय म्हणता येईल?

(1) नैमित्तिक किंवा एकात्मता यापैकी कोणतीही प्रेरणा नाही

(2) एकात्मता आणि नैमित्तिकता या दोन्ही प्रेरणा

(3) एकात्मता प्रेरणा

(4) नैमित्तिक प्रेरणा

**114.** पुढीलपैकी कोणती भाषा अभिजात भाषा नाही?

(1) हिंदी (2) तामिळ (3) संस्कृत (4) तेलुगु

www.careerindia.com

CAREERINDIA

**115.** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 नुसार विदेशी भाषा अध्ययन या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य नाही?
(1) एक अतिरिक्त भाषा म्हणून फ्रेंच भाषा सुचविण्यात आलेली आहे.
(2) माध्यमिक पातळीवर विदेशी भाषा एक अतिरिक्त पर्याय म्हणून अभ्यासणे.
(3) त्रिभाषा धोरणातील एक भाषा म्हणून विदेशी भाषेचा अंतर्भाव.
(4) विदेशी भाषेचा त्रिभाषा धोरणात एक भाषा म्हणून अंतर्भाव नसणे.

**116.** पुढीलपैकी कशाचा संबंध 'भाषेबद्दलचे ज्ञान' याच्याशी आहे?
(1) नीतीगत क्षमता (Strategic Competence)
(2) निर्देशक ज्ञान (Declarative Knowledge)
(3) प्रक्रियाधिष्ठित ज्ञान (Procedural Knowledge)
(4) व्याकरणिक ज्ञान (Grammatical Knowledge)

**117.** इयत्ता सहावीची शिक्षिका बोलण्याच्या उपक्रमासाठी खालील कृती विकसित करते.
''वाळवंट आणि तिथल्या वातावरणावर पाच वाक्ये बोला''. ही कृती योग्य आहे किंवा नाही? हे ठरविण्यासाठी पुढीलपैकी योग्य कारण असलेले विधान निवडा.
(1) ही योग्य कृती नाही कारण वाळवंट आणि तिथले वातावरण यावर बोलण्यासाठी अपेक्षित माहिती नाही.
(2) ही एक योग्य कृती आहे, कारण विद्यार्थ्यांनी भूगोलाच्या वर्गात वाळवंटाचा अभ्यास केला असणार, म्हणजे त्यांना यावर बोलता येईल.
(3) ही एक योग्य कृती आहे, कारण यातून विद्यार्थ्यांना एखाद्या विषयावर बोलता येईल, जसे वाळवंट.
(4) ही योग्य कृती नाही कारण काही विद्यार्थ्यांना वाळवंटाबद्दल माहिती नसणार.

**118.** भाषेची बोली या संदर्भातले पुढीलपैकी कोणते विधान योग्य आहे?
(1) काही वेळा विविध सामाजिक गट एकाच भाषेच्या विविध बोली बोलतात.
(2) भाषेच्या बोली परिसरानुरुप बदलतात.
(3) एका भाषेच्या विविध बोली बोलणारी माणसे दुसऱ्या बोलीतला माणूस काय बोलतो ते समजतात.
(4) बोली ही व्यापक श्रेणीत असते आणि भाषा ही लहान श्रेणीत असते.

**119.** पुढीलपैकी कोणते कार्य समाकलित (integrated) शिक्षण कौशल्याला उत्तेजन देते?
(1) लेख लिहिणे (2) भूमिकाभिनय
(3) नियत कार्य (Assignment) (4) प्रकल्प कार्य

**120.** ससंदर्भ व्याकरण शिक्षणाच्या संदर्भात पुढील धोरणाला काय म्हणता येईल?
'भाषिक घटकांचा ससंदर्भ परिचय, विद्यार्थ्यांना भाषा घटकांकडे लक्ष देण्यास सांगणे, वास्तव जीवन संदर्भात त्यांचा वापर करण्यास सक्षम करणे आणि भाषा घटकांना ओळखण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे'.
(1) जाणीव उन्नत करणे (Consciousness Raising)
(2) मनोबंध तयार करणे (Schema)
(3) निगमन पद्धती (Deductive Method)
(4) शोध पद्धती (Discovery Method)

www.careerindia.com

परीक्षार्थींनी **भाषा–II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–V** मधील ( **प्रश्न क्र. 121** ते **150** ) यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-V (Q.No. 121-150)**, if they have opted **MARATHI** as **Language-II** only.

www.careerindia.com

**भाग–V**

**भाषा–II**

**मराठी**

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **( प्रश्न क्र. 121 ते 150 )** यांची उत्तरे द्यावीत.

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 121 ते 128 यासाठी योग्य पर्याय निवडा.**

छोटेसे घर, त्या भोवती दाटीवाटीने लावलेला बगीचा. त्यातील अनेकरंगी फुले आम्हाला वेड लावत. आजूबाजूचा परिसरही बंगले व बगीचा यांनी भरलेला. मग काय विचारायलाच नको! हवी तेवढी फुले उपलब्ध. श्रावणात तर लाखोली वाहण्यासाठी आम्ही मुले सकाळपासूनच त्या झाडाखाली. ज्यांचे व्रत असेल त्याला ती गोळा करून देणे, हे आमचे कामच! कोणाची मंगळागौर असो, की हरतालिका असो. आम्ही मैत्रिणी फुलझाडे धुंडाळत फिरत असू. गच्च भरलेली जास्वंदीची झाडे, त्यांची भरीव एकेरी लाल गुलाबी फुले, गोकर्णीची कानाच्या आकाराची पांढरी, निळी फुले.

मधूनच छोट्या वेलीला आलेली गणेश फुले, काय तोडू नी काय नको, असे होऊन जात असे. मंगळागौर कोण्या नव्या नवरीची, पण उत्साह आमचाच जास्त. पहिलटकरणीचे डोहाळजेवण व झुला सजवायलाही आम्ही मैत्रिणी हजर. पाने–फुले यांच्या महिरपीने झोका गच्च भरून सजविला जाई. हरतालिकेला धोतऱ्याची झाडे, रुईची जांभळी फुले आणण्यासाठी पानांची माळ लागे. झाडा–झुडपांतून ती पाने शोधावी लागत. तेही संशोधन आम्ही विनातक्रार कित्येकदा केले आहे.

शाळेत जाताना बुचाची फुले गोळा करावी, त्याची गुंफून वेणी करावी व लगेच केसात माळावी, हा नेहमीचाच उद्योग. बुचाचे झाड ताडासारखे उंच. त्यामुळे ती फुले तोडणे शक्यच नसायचे. म्हणून वाऱ्याच्या झोताबरोबरच फुले पडतील या आशेने अर्धा–अर्धा तास आम्ही झाडाखालीच घालवत असू. हे सारे महाविद्यालयात गेल्यावर तर कधीही फुलांशिवाय माझे पान हालत नसे. रोजच गजरा. कधी अबोली, कधी जाई–जुई, तर कधी मोगरा. अगदी जांभळी, पांढरी, सोनेरी, कोरांटीची फुलेसुद्धा माझ्या केसावर फुलून येई. दसरा–दिवाळीच्या वेळी तर बागा अनेक तऱ्हेच्या शेवंतीने बहरून यायच्या. हा मोसम म्हणजे फुलांची पर्वणीच! छोटी बट शेवंती, गोंडा शेवंती, सोनेरी, पांढरी, पिवळी, अगदी गर्द लाल शेवंतीही या ऋतुत फुलून यायची आणि हिरव्यागार बागेला झेंडूची सोनपिवळी किनार नजर लागावी इतकी सुंदर दिसत असे. या सणांच्या दिवसांत अंगणात रांगोळीदेखील फुलांचीच असे.

रात्री जेवणानंतर शतपावलीची सवय लागली ती फुलांच्या ओढीनेच. जिवाला वेड लावणारे ते रातराणी, मधुकामिनी, मधुमालती, जाई–जुईचा मादक वास मन धुंद करून टाकत. अन् अवचित ती सुगंधाची खाण शोधण्यासाठी मन सैरभैर होई. खरे तर रातराणीचा जीव किती लहान, अगदी नखाएवढा! पण, सारा आसमंत भारून टाकण्याचे सामर्थ्य त्या चिमुकल्या फुलांमध्ये एकवटलेले असते. रात्रीची शोभा वाढविणारे जाई–जुईचे, सायलीचे नाजूक घोस अंधारातही इतरांना जीव तोडून सुगंध देत असतात. निसर्गाने दिलेले दान इतरांना मुक्तपणे वाटत असतात. कधी कधी कुंपणावर विविधरंगी बोगनवेलेही विराजमान झालेल्या दिसत; पण मला मात्र ते कागदी फूल कधीच आवडले नाही.

मला फुले आवडतात – अगदी फळांचीसुद्धा. पेरूची पांढरी पारदर्शक फुले, डाळिंबाची केशरी फुले, वांग्याची जांभळी, तर भेंडीची काहीशी लालसर मोठी फुले मी मन लावून बघते. त्यातील अनोखे लावण्य भुरळ घालते. बालकवींनी नाही का अगदी क्षुद्र वाटणाऱ्या गवतफुलाला आपल्या कवितेने अजरामर करून टाकले.

सृष्टीचे सारे सौंदर्य परमेश्वराने फुलांत उधळले आहे. नाजूक रंगरूप, अनोखे आकार, सुवास या सर्वांचे लेणे लेवून फुले जन्माला येतात. अगदी परमेश्वराच्या अंगाखांद्यावर खेळण्याचे भाग्यही त्यांनाच लाभले; पण ही फुले मात्र क्षणभंगुरतेचा शाप घेऊन सृष्टीवर येतात व मानवाला त्याच्या जन्मापासून तर अगदी मृत्यूपर्यंत साथ देतात. झाडावरून तोडले जाताना तोडणाऱ्याची इच्छा पुरवितात. न तोडता झाडावरच काही फुले राहतात, ती बिचारी आपला कार्यकाल संपताच निमुटपणे मातीत मिसळून जातात. अशा फुलांच्या निकट राहण्याचे भाग्य आपल्याला मिळाले. आता नवीन पिढी संकुचित घरात, टीचभर जागेत हा आनंद मिळवू शकणार नाहीत.



www.careerindia.com

CAREERINDIA

**121.** डाळिंबाची फुले कोणत्या रंगाची असतात?

(1) लालसर (2) जांभळी (3) केशरी (4) पांढरी

**122.** पुढीलपैकी कोणत्या फुलांचा गजरा लेखिकेने माळल्याचा उल्लेख येत नाही?

(1) अबोली (2) चाफा (3) मोगरा (4) कोरांटी

**123.** '<u>नाजूक</u> रंगरूप' यातील अधोरेखित शब्द काय आहे?

(1) गुणविशेषण (2) क्रमविशेषण (3) क्रियाविशेषण (4) गणनाविशेषण

**124.** 'शेवंतीही या ऋतूत फुलून यायची <u>आणि</u> हिरव्यागार बागेला झेंडूची सोनपिवळी किनार' यातील अधोरेखित काय आहे?

(1) केवलप्रयोगी अव्यय (2) शब्दयोगी अव्यय

(3) उभयान्वयी अव्यय (4) क्रियाविशेषण अव्यय

**125.** सृष्टीचे सौंदर्य लेखिकेला कशात दिसते?

(1) फुलांच्या क्षणभंगूरतेत (2) फुलांच्या नाजूकपणात

(3) फुलांच्या उधळणीत (4) फुलांवरील कवितेत

**126.** लेखिकेला न आवडणारे फुल कोणते?

(1) गोकर्णी (2) पांढरी कोरांटी (3) बोगनवेल (4) गुलबक्षी

**127.** फुलांच्या बाबतीत लेखिकेला कशामुळे दुःख वाटते?

(1) फुलांचे नाजूकपण (2) फुलांचे अल्पायुष्य (3) फुलांचे आकार (4) फुलांचे रंग

**128.** 'मला फुले <u>आवडतात</u>' यातील अधोरेखित काय आहे?

(1) क्रियापद (2) कर्म (3) कर्ता (4) विशेषण

www.careerindia.com

CAREERINDIA

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 129 ते 135 यासाठी योग्य पर्याय निवडा.**

पावसाळ्यात माझा सगळ्यात आवडता उद्योग म्हणजे अंगावर पांघरूण घेऊन, डोळे मिटून कौलारावर वाजणारा पाऊस ऐकणे. खूप मजा येई असा पाऊस ऐकताना. कौलांवर वाजणाऱ्या जलधारा, त्यातून आत उडणारे तुषार, सगळीकडे कुंद वातावरण आणि तोंडावर पांघरूण घेऊन, कानात प्राण आणून पाऊस ऐकणारी मी. पण हा आनंद फार वेळ घेता येत नसे. कारण सकाळी सव्वा नऊ–साडे नऊ वाजता वडील शाळेत जायला निघत तेव्हा आईचा सगळा स्वयंपाक झालेला असे. आमची न्याहारी आणि वडिलांचे जेवण बरोबरच झाले पाहिजे, हा नियमच होता. त्यामुळे पावसाचं गाणं अर्धवट सोडून उठावचं लागे. पावसाच्या आणि थंडीच्या दिवसात आमची न्याहारी म्हणजे एक मज्जाच होती. माझी आई बाजरीच्या भाकरी करी. त्या दुरडीत न ठेवता मोठ्या परातीत थोड्या पसरून ठेवी. त्यातली वाफ जाऊन त्या थंड झाल्या की माझे वडील त्या भाकरी परातीत बारीक कुस्कुरीत. त्यात ओंजळभर साजूक तूप घालीत. बारीक फोडलेला गूळ घालीत. त्या काल्याचा एक एक भला मोठा लाडू बनवीत आणि आम्हाला प्रत्येकाला देत. माझ्या वडिलांच्या भारदस्त हातांनी बनविलेला तो गुळ–तुपाचा लाडू संपता संपत नसे. पण तो संपवावाच लागे. कारण आमचं खाणं झाल्याशिवाय वडील तिथून उठत नसत.

आमची न्याहारी आणि वडिलांचं जेवण झालं की वडील शाळेत जायला निघत. पांढरेशुभ्र, तलम असे टाटा फिनलेचे धोतर, पांढराशुभ्र नेहरू शर्ट, त्यावर बिन बाह्यांचा खादीचा कब्जा किंवा लांब हातांचा काळा कोट, डोक्यावर गांधी टोपी, पायात रबर सोल मारलेल्या कोल्हापुरी वहाणा अशा वेषात माझे वडील शाळेत निघाले की मी त्यांचं बोट पकडून त्यांच्या मोठ्या काळ्या छत्रीत रस्त्यापर्यंत जात असे. कोणी ना कोणी थांबवून वडिलांशी बोलत उभे राहत तेव्हा मी वडिलांच्या धोतराचा सोगा पकडून उभी राही. माझे वडील दूर जाऊ नयेत असे मला वाटे. ते मला म्हणत, 'उजा! शाळेत जायचं बरं का. पळा आता.' मग मी भिजत भिजत धावतच घरी येई.

www.careerindia.com

**129.** 'सव्वा नऊ–साडे नऊ वाजता वडील शाळेत जायला निघत.' या वाक्यातील अधोरेखित शब्द ओळखा.

(1) संख्याविशेषण (2) विशेषनाम (3) सर्वनाम (4) क्रियापद

**130.** 'बाजरीच्या भाकरी' हे काय आहे?

(1) भाववाचक नाम (2) विशेषनाम (3) नाम (4) सर्वनाम

**131.** लेखिकेचा आवडता छंद कोणता?

(1) शाळेत जाणे (2) पावसाचे तुषार उडवणे

(3) वडिलांबरोबर जेवण करणे (4) कौलारांवरच्या पावसाचा आवाज ऐकणे

**132.** 'पारदर्शक' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा.

(1) ऊर्जा (2) अपारदर्शक (3) वास्तवता (4) स्वच्छता

**133.** 'आईचा सगळा स्वयंपाक झालेला असे.' यातील अधोरेखित काय आहे?

(1) शब्दयोगी अव्यय (2) अकर्मक क्रियापद (3) संयुक्त क्रियापद (4) सकर्मक क्रियापद

**134.** 'पांढरेशुभ्र तलम असे टाटा फिनलेचे धोतर' यातील अधोरेखित काय आहे?

(1) विशेषनाम (2) विशेषण (3) कर्म (4) अव्यय

**135.** 'तुषार' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?

(1) धारा (2) पाणी (3) बिंदू (4) फवारे

**136.** ''अश्विनीला ओरिया भाषा तिच्या जन्मापासून येते आणि ती इंग्रजी आणि हिंदी शिकते.'' या विधानाच्या आधारे पुढीलपैकी कोणता पर्याय हा बरोबर नाही?

(1) तिचे इंग्रजी शिक्षण म्हणजे भाषा आत्मसात करणे आहे.

(2) तिचे ओरिया शिक्षण म्हणजे भाषा आत्मसात करणे आहे.

(3) तिचे हिंदी शिक्षण म्हणजे भाषा शिक्षण

(4) तिचे इंग्रजी शिक्षण म्हणजे भाषा शिक्षण

**137.** नैमित्तिक प्रेरणा तेंव्हा असते जेंव्हा __________

(1) माणूस पुस्तक लिहिण्यासाठी भाषा शिकतो.

(2) माणूस रोजगारासारख्या कारणास्तव भाषा शिकतो.

(3) माणूस त्या मूळभाषक लोकांशी जवळीक साधण्यासाठी भाषा शिकतो.

(4) माणूस त्या लोकांच्या सामाजिक, धार्मिक सोहळ्यांसाठी भाषा शिकतो.

**138.** कृपा आणि करण हे दोघे जुळे भाऊ मणिपुरीची एक बोली वापरतात मात्र बोलताना त्यांच्यात फरक जाणवतो. बोलीभाषा बोलण्याची त्यांची वैयक्तिक शैली म्हणजे __________.

(1) मणिपुरी (Manipuri) (2) आयडियोलेक्ट (Idiolect)

(3) बोली (Dialect) (4) भाषण कृती (Speech Act)

**139.** भारतीय राज्य घटनेमध्ये इंग्रजीला कोणता दर्जा देण्यात आला आहे?

(1) संवैधानिक संस्थांची भाषा (2) कार्यालयीन भाषा

(3) सहयोगी कार्यालयीन भाषा (4) विदेशी भाषा



www.careerindia.com

CAREERINDIA

**140.** प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वतंत्रपणे उणिवा आणि क्षमता जाणून घेण्यासाठी केलेली चाचणी म्हणजे ________.

(1) संस्कारक्षम चाचणी (Formative test) (2) उद्दिष्ट चाचणी (Objective test)

(3) वैधता चाचणी (Validity test) (4) नैदानिक चाचणी (Diagnostic test)

**141.** अदितीला भूतकाळाचे नियम माहित आहेत, पण तिला त्याचा योग्य संदर्भात वापर करता येत नाही. तिला कोणत्या प्रकारचे ज्ञान आहे?

(1) ज्ञानाचे उपयोजन (Application of Knowledge)

(2) भाषा आत्मसात करण्याचे तंत्र (Language acquisition device)

(3) प्रक्रियात्मक ज्ञान (Procedural Knowledge)

(4) निर्देशक ज्ञान (Declarative Knowledge)

**142.** भाषेच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान बरोबर नाही?

(1) काही भाषा फक्त विज्ञान आणि अभियांत्रिकी चांगल्या प्रकारे समजवू शकतात.

(2) भाषा ओळख अभिव्यक्त करते.

(3) भाषा ही इतिहासाचे अवशेष आहे.

(4) मानवीय ज्ञानात भाषा भर टाकते.

**143.** भाषावर्गात प्रकल्प विकसित करणे आणि प्रकल्प कार्य करणे यात कोणत्या क्रमाने क्रिया सहभागी असतात?

(1) शिक्षक आणि विद्यार्थी त्यांना हवा तसा प्रकल्प तयार करून सादर करू शकतात.

(2) गट निर्मिती, नियोजन, माहिती संग्रहण, माहितीचे विश्लेषण, आराखडा लिहिणे, विषय ठरवणे, अंतिम अहवाल तयार करणे.

(3) गट निर्मिती, विषय ठरवणे, नियोजन, माहिती संग्रहण, माहितीचे विश्लेषण, आराखडा लिहिणे, अंतिम अहवाल तयार करणे.

(4) गट निर्मिती, विषय ठरवणे, नियोजन, माहिती संग्रहण, आराखडा लिहिणे, माहितीचे विश्लेषण, अंतिम अहवाल तयार करणे.

**144.** 'ऐकणे' यासाठी अधोगामी (Top-down) पद्धतीत याचा समावेश असतो.

(1) प्रत्येक ध्वनी, शब्द, कथन, पदबंध आणि वाक्य ऐकणे.

(2) विशिष्ट तपशिलावर भर देणे.

(3) व्याख्यान, मजकूर किंवा ध्वनिफितीचा आशय ऐकणे.

(4) व्याख्यान, मजकूर किंवा ध्वनिफितीतील एकूण संदेश ऐकणे.

www.careerindia.com

CAREERINDIA

**145.** इयत्ता सातवीच्या शिक्षिकेला लेखन कार्यात एका माणसाचे तपशील लिहायला सांगायचे आहेत. ती वर्गाबाहेर जाऊन एका फेरीवाल्याला त्याच्या टोपली सह घेऊन येते. ती त्याला जवळपास सात मिनिटे वर्गात थांबायला सांगते आणि विद्यार्थ्यांना गटात बसून त्या फेरीवाल्याचे विवरण/तपशील लिहिण्यास सांगते. या उपक्रमात त्या फेरीवाल्याची काय भूमिका आहे?

(1) साधन
(2) शिक्षण सहाय्यक
(3) फेरीवाला
(4) उपक्रमात सहभाग घेणारा

**146.** इयत्ता सातवीची शिक्षिका मुलांना मजकुरातील लोक आणि समाज यांचे महत्त्व आणि ओळख या बद्दल समजून घेण्यास सांगते. या उपक्रमातून शिक्षिकेला विद्यार्थ्यांच्या कोणत्या क्षमतेला उत्तेजन देण्याचे लक्ष्य आहे?

(1) साहित्यिक कौशल्य
(2) भाषा साक्षरता
(3) सर्जनशील साक्षरता
(4) विश्लेषणात्मक वाचन

**147.** राष्ट्रीय शैक्षणिक नीती (NEP) 2020 ने पुरस्कृत केलेल्या अभिजात भाषेच्या अभ्यासासंदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य आहे?

(1) अभिजात भाषेचा माध्यमिक पातळीवर एक मुख्य भाषा म्हणून अभ्यास
(2) अभिजात भाषेचा माध्यमिक पातळीवर एक अतिरिक्त भाषा म्हणून अभ्यास
(3) अभिजात भाषेचा त्रिभाषा धोरणातील एक भाषा म्हणून अभ्यास
(4) अभिजात भाषेचा पूर्व तयारीच्या (Preparatory) पातळीवर अभ्यास

**148.** पुढील उतारा वाचा आणि मजकूर कोणत्या विषयाच्या नोंदीशी संबंधित आहे ते सुचवा.

''क्रांती झाल्यानंतर, अचानक हे बदलता येऊ शकते असे वाटले. युरोप आणि एशिया सह जगातील अनेक भागात वैयक्तिक अधिकार आणि नियंत्रित सामाजिक अधिकार याबाबत नवीन विचारांवर चर्चेला सुरुवात झाली. भारतात, राजा राममोहन राय आणि डिरोझियो यांनी फ्रेन्च राज्य क्रांतीच्या प्रस्तुततेची चर्चा केली. वसाहतींच्या विकासानंतर या विचारांची सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात पुनर्मांडणी झाली.''

(1) क्रांती नोंद
(2) विज्ञान नोंद
(3) राजकीय नोंद
(4) समाजविज्ञान नोंद

**149.** इयत्ता आठवीचे शिक्षक सुभाष खेदाने म्हणतात, ''भाषिक मूल्यमापन सर्वसाधारणपणे ग्रहण कौशल्यांना (Receptive Skills) महत्त्व देत नाही.'' त्यांच्या मते ग्रहण कौशल्ये म्हणजे __________.

(1) बोलणे आणि लिहिणे
(2) ऐकणे आणि लिहिणे
(3) बोलणे आणि वाचणे
(4) ऐकणे आणि वाचणे

www.careerindia.com

150. विद्यार्थ्याला कळते, समजते की भाषा ही एक व्यवस्था म्हणून कार्य करते __________.

(1) धोरणात्मक सामर्थ्य (Strategic Competence)

(2) संज्ञापनात्मक सामर्थ्य (Communicative Competence)

(3) व्यवस्थाधिष्ठित सामर्थ्य (Systemic Competence)

(4) समाजभाषा वैज्ञानिक सामर्थ्य (Sociolinguistic Competence)

- o O o -

www.careerindia.com

SPACE FOR ROUGH WORK

www.careerindia.com

**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्न पत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.
2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या **बाजू-2** वर केवळ एकच वर्तुळ **निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन** ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर ते बदलता येणार नाही.
3. परीक्षार्थींनी OMR उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक OMR उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.
4. चाचणी-पुस्तिका आणि OMR उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि OMR उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.
5. चाचणी-पुस्तिका/OMR उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.
6. OMR उत्तरपत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेश पत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.
7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभागृहात/खोलीमध्ये आणण्याची परवानगी नाही.
8. मोबाईल फोन, तार रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.
9. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.
10. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.
11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे OMR उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची OMR उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल. परीक्षार्थींनी आपल्या डाव्या हाथाच्या अंगठ्याचा ठसा उपस्थिती पृष्ठावर दिलेल्या ठिकाणी करावा.
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.
13. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.
14. चाचणी-पुस्तिका अथवा OMR उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.
15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी OMR उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.**

www.careerindia.com

CAREERINDIA

## निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **नीले/काले बॉल पॉइन्ट पेन** से भरें। एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस OMR उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ। परीक्षार्थी अपना अनुक्रमांक OMR उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें।
4. परीक्षा पुस्तिका एवं OMR उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं OMR उत्तर पत्र के कोड या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी।
5. परीक्षा पुस्तिका/OMR उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका कोड व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से उपस्थिति-पत्र में लिखें।
6. OMR उत्तर पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी। इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्विच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए। इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और परीक्षार्थी विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें।
11. कार्यरत निरीक्षक को अपना OMR उत्तर पत्र दिए बिना एवं उपस्थिति-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे। यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार उपस्थिति-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने OMR उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा। **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अंगूठे का निशान उपस्थिति-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ।**
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी परीक्षण संस्था के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं। अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला परीक्षण संस्था के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा।
14. किसी भी परिस्थिति में परीक्षा पुस्तिका और OMR उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल/कक्ष छोड़ने से पूर्व OMR उत्तर पत्र निरीक्षक को अवश्य सौंप दें।** ***परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं।***

## READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY :

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Blue / Black Ball Point Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the OMR Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the OMR Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the OMR Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and OMR Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and OMR Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet/OMR Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the examination halls/rooms. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against the candidate including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his/her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his/her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/Room without handing over their OMR Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the OMR Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic/Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Examining Body with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Examining Body.
14. No part of the Test Booklet and OMR Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the OMR Answer Sheet to the Invigilator in the Hall / Room.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***

www.careerindia.com